# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

**३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई - ४०० ००१.**

दूरध्वनी - ३०२३३४१२, २६९ ०६०२, २६४ ११५०/५१, फॅक्स - २६९ ०००७

E-mail : desk१२@dtemaharashtra.gov.in Internet : www.dtemaharashtra.gov.in

कार्यालयीन आदेश

क्रमांक : १२/आस्था(२)/आप्रयो/२०२०/६८

दिनांक : 12 FEB 2020

संदर्भ : १. शासन वित्त विभाग निर्णय क्र.वेतन ११९९/प्र.क्र.२/९९/सेवा-३, दि.२०/७/२००१
२. शासन वित्त विभाग निर्णय क्र.वेतन ११०९/प्र.क्र.४३/सेवा-३, दि.३१/८/२००९
३. शासन वित्त विभाग निर्णय क्र.वेतन ११०९/प्र.क्र.४४/सेवा-३, दि.१/४/२०१०
४. शासन वित्त विभाग निर्णय क्र.वेतन ११०९/प्र.क्र.४१/सेवा-३, दि.५/७/२०१०
५. शासन वित्त विभाग निर्णय क्र.वेतन ११११/प्र.क्र.८/सेवा-३, दि.१/७/२०११
६. शासन वित्त विभाग निर्णय क्र.आप्रयो १०१४/प्र.क्र.२१/सेवा-३, दि.६/९/२०१४
७. शासन वित्त विभाग निर्णय क्र.वेतन-२०१९/प्र.क्र.२३/सेवा-३, दि.१/३/२०१९
८. शासन वित्त विभाग निर्णय क्र.वेतन-१११९/प्र.क्र.३/सेवा-३, दि.२/३/२०१९
९. कार्यालयीन आदेश क्र. १२/आस्था(२)/आप्रयो/२०१८/३३६८, दि.३१.१२.२०१८ व क्र. १२/आस्था(२)/आप्रयो/२०१७/३५६, दि.१५.०३.२०१७

संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई हे संदर्भिय शासन निर्णयातील तरतुदीनुसार बृहन्मुंबई संवर्गातील गट क व गट ड मधील पदावर कार्यरत कर्मचाऱ्यांना पदोन्नतीची संधी उपलब्ध नसल्याने, कुंठीतता घालविण्यासाठी सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेनुसार सोबत जोडलेल्या **विवरणपत्र- ड** मध्ये नमूद केलेल्या कर्मचाऱ्यांनी वरील शासन निर्णयातील विहित अटींची पूर्तता होत असल्याच्या बाबींची छाननी करुन विभागीय पदोन्नती समितीने शिफारस केलेली असल्याने त्यांच्या नांवासमोर नमूद केलेला वरिष्ठ पदाचा मॅट्रिक्स मधील स्तर संदर्भीय क्रमांक ७ व ८ मधील शासन निर्णयातील तरतुदींनुसार केलेली असल्यामुळे, संदर्भाधीन ९ अन्वये देण्यात आलेल्या पहिल्या लाभाचा दिनांक सुधारीत करुन त्यांच्या नांवासमोर नमूद केलेली वरिष्ठ पदाचा मॅट्रिक्स मधील स्तर संदर्भीय क्रमांक ७ व ८ मधील शासन निर्णयातील तरतुदींनुसार व खालील नमूद केलेल्या अटींच्या अधीन राहून मंजूर करीत आहेत.

१. सदर कर्मचाऱ्यांना या योजनेंतर्गत वरिष्ठ वेतनश्रेणी दिल्यावर वेतननिश्चिती नियमित पदोन्नती प्रमाणेच होईल. मात्र त्याच वेतनश्रेणीत नियमित कार्यात्मक (functional) पदोन्नती मिळाल्यानंतर पुन्हा वेतननिश्चितीचा लाभ देय होणार नाही.

२.सोबतच्या परिशिष्टामधील कर्मचाऱ्यांनी त्यांना मंजूर करण्यात आलेल्या सुधारीत सेवा अंतर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या लाभासंबंधी संदर्भीय शासन निर्णयातील अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे लेखी हमीपत्र आदेशाच्या दिनांकापासून सात दिवसांच्या आत कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील.

३. यां योजनेखाली या आदेशान्वये लाभ मंजूर केल्यानंतर प्रत्यक्ष पदोन्नती नाकारलेल्या अथवा पदोन्नतीस अपात्र ठरलेल्या कर्मचाऱ्यांना सदर आदेशान्वये मंजूर करण्यात आलेले लाभ काढून घेण्यात येतील व अशा लाभाची शासन नियमानुसार वसूली करण्यात येईल.

४. चूकीच्या तपशिल/ माहितीच्या आधारे लाभ दिला गेल्याचे कोणत्याही टप्प्यावर निर्दशनास आल्यास दिलेला लाभ स्वतंत्र विहित आदेशान्वये पूर्वलक्षी प्रभावाने काढून घेण्यात येतील.

( डॉ. अभय वाघ )
संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म. रा., मुंबई.

प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित :
१. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई (मानार्थ)(कार्यासन क्रमांक ६ मार्फत)
२. कार्यासन क्रमांक ६, मुख्य कार्यालय, मुंबई
३. संबंधीत कर्मचारी, त्यांना कळविण्यात येते की, उपरोक्त संदर्भीय शासन निर्णयात विहित केल्याप्रमाणे वेतन निश्चितीचा विकल्प दोन प्रतींमध्ये हे आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून एक महिन्यांच्या आत कार्यालय प्रमुखांना देण्यात यावा.
४. वैयक्तिक नस्ती/ निवडनस्ती

कार्यालयीन आदेश क्रमांक : 12/आस्था(2)/आप्रयो/2020/68, दिनांक 12 FEB 2020 सोबतचे विवरणपत्र- ड

बृहन्मुंबई संवर्गातील गट-क व गट-ड मधील कर्मचाऱ्यांना दिनांक ३१-३-२०२० पर्यंत सातव्या वेतन आयोगातील तरतूदींनुसार सेवा कालावधी १०-२०-३० वर्षे पूर्ण झाल्याने आश्वासित प्रगती योजना लागू करण्यासाठी कर्मचाऱ्यांच्या यापूर्वीच्या योजनेनुसार लागू करण्यात आलेला पहिल्या लाभाचा दिनांक सुधारीत व वरिष्ठ स्तर मंजूर केलेल्या कर्मचाऱ्यांचा तपशिल दर्शविणारे विवरणपत्र

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचे नांव, पदनाम, कार्यरत कार्यालयाचे नांव | प्रथम नियुक्तीचा दिनांक व पदनाम | | पदोन्नतीचा पहिल्या लाभाचा दिनांक, पदनाम व वेतनसंरचना | | | पहिल्या लाभाचा सुधारीत दिनांक व वरिष्ठ पदाचा मॅट्रिक्स मधील स्तर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. दादाराव बळीराम राठोड, टिप्पणी सहाय्यक, मुख्य कार्यालय, मुंबई | २१-०३-२००५ | टिप्पणी सहाय्यक | २१-०३-२०१७ | मुख्य लिपिक | ९३००-३४८०० (GP४२००) | ०१-०१-२०१६ मॅट्रिक्स मधील स्तर एस -१३ |
| २ | श्री. उमेश हरि वावमारे, टिप्पणी सहाय्यक, मुख्य कार्यालय, मुंबई | १२-०९-२००५ | टिप्पणी सहाय्यक | १२-०९-२०१७ | मुख्य लिपिक | ९३००-३४८०० (GP४२००) | ०१-०१-२०१६ मॅट्रिक्स मधील स्तर एस -१३ |
| ३ | श्रीमती अक्षदा उदय देसाई, शिपाई, मुख्य कार्यालय, मुंबई | २७-०८-२००४ | शिपाई | २७-०८-२०१६ | शिपाई | ४४४०-७४४० (GP१३००) | ०१-०१-२०१६ मॅट्रिक्स मधील स्तर एस -४ |

( डॉ. अभय वाघ )
संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म. रा., मुंबई.